**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ अ नुसार निदेश**
**लोकसभा सार्वत्रिक निवडणूक/विधानसभा सार्वत्रिक निवडणूक व छायाचित्र मतदार याद्यी पुर्नरिक्षण**
**सहकारी गृहनिर्माण संस्थांचे "अध्यक्ष" व "सचिव" यांना " मतदान केंद्रस्तरिय स्वयंसेवक" (Booth level volunteers) म्हणून घोषित करणेबाबत.**

Repeated

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
परिपत्रक क्र.सगृयो-२०१२/प्र.क्र.७७/१४स
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २२ ऑगस्ट, २०१२.

**वाचा:-** शासन निर्णय क्रमांक सगृयो-२००९/प्र.क्र.२३५/१४स, दिनांक १९ एप्रिल, २०१०.

**प्रस्तावना :-**

भारत निवडणूक आयोग नवी दिल्ली यांचेमार्फत मतदार याद्या/निवडणूक ओळखपत्र अद्ययावत करण्याचे काम सतत चालू असते. सदर कामासाठी नोंदणीकृत गृहनिर्माण सहकारी संस्थामधील सभासद, राज्य निवडणूक आयोग/जिल्हा निवडणूक आयोगामार्फत नियुक्त केलेल्या कर्मचारीवर्गास अपेक्षित सहकार्य करीत नाहीत असे निदर्शनास आल्याने, राज्याचे मुख्य निवडणुक अधिकारी यांनी केंद्र शासनाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने दिलेल्या निदेशानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९-अ अन्वये शासनास प्राप्त अधिकारानुसार राज्यातील नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थेमधील सभासदांना, मा.भारत निवडणूक आयोग राबवित असलेल्या निवडणूकपूर्व कार्यक्रमास संपूर्णपणे सहकार्य करणेबाबत उपरोक्त वाचा येथील दिनांक १९.४.२०१० च्या परिपत्रकान्वये अनिवार्य करण्यात आले होते. या परिपत्रकान्वये सर्व विभागीय सह निबंधक, जिल्हा उपनिबंधक, उपनिबंधक, सहकारी गृहनिर्माण संस्था यांना, संस्थांनी माहिती भरुन दिल्याची खात्री करावी असे स्वयंस्पष्ट निदेश दिले होते. तथापि दोन वर्ष उलटूनही याबाबत मोठ्याप्रमाणावर नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांनी अपेक्षित अशी कार्यवाही केल्याचे आढळून येत नाही. या संदर्भात आता भारत निवडणूक आयोगाने त्यांचे पत्र क्र.२३/२०१२/ERS, दिनांक १९.४.२०१२ अन्वये सर्व नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या छायाचित्र मतदार यादयांच्या वार्षिक पुनरिक्षण कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी अशा नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना "मतदान केंद्रस्तरिय स्वयंसेवक" (Booth level volunteers) म्हणून घोषित केलेले आहे. हे विचारात घेऊन भारत निवडणूक आयोगाच्या उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने आवश्यक ते निदेश निर्गमित करावेत अशा राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांनी या विभागास सूचना दिलेल्या आहेत .

**परिपत्रक :-**

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या उपरोक्त सूचना विचारात घेऊन, महाराष्ट्र सहकारी संस्था



Scanned by CamScanner

अधिनियम १९६० चे कलम ७९-अ अन्वये शासनास प्राप्त अधिकारानुसार खालीलप्रमाणे निदेश निर्गमित करण्यात येत आहेत :-

१) सहकारी गृहनिर्माण संस्थांचे "अध्यक्ष" व "सचिव" यांना " मतदार केंद्रस्तरिय स्वयंसेवक" (Booth level volunteers) म्हणून घोषित करण्यात येत आहे. हे "मतदान केंद्रस्तरिय स्वयंसेवक" (Booth level volunteers) छायाचित्र मतदार याद्यांचा पुनरिक्षण कार्यक्रम, राष्ट्रीय मतदार दिवस अशा निवडणूकांशी संबंधित महत्वाचे कामात सहभागी होऊन संबंधित "मतदार नोंदणी अधिकारी" यांना "लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५०" च्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास सहकार्य करतील.

२) गृहनिर्माण संस्थांचे "अध्यक्ष" व "सचिव" हे " मतदान केंद्रस्तरिय स्वयंसेवक" (Booth level volunteers) म्हणून संबंधित "मतदार नोंदणी अधिकारी" व "सहायक निबंधक सहकारी संस्था" यांचे स्तरावरुन वर्षातून किमान दोन वेळा घेण्यात येणाऱ्या "संयुक्त बैठकीस" (Joint Meeting) सहभागी होतील.

३) गृहनिर्माण संस्थेमधील रहिवाशी जे १८ वर्षांचे होतील, त्यांची नव्याने मतदार म्हणून नोंदणी करणे, सदस्य/रहिवासी जागा सोडून गेल्यास, सदस्यांचा /रहिवाशांचा मृत्यू झाल्यास त्यांची नावे वगळणे याबाबतची सर्व माहिती प्राधान्याने आपल्या भागातील "मतदार नोंदणी अधिकारी" यांचेकडे " मतदान केंद्रस्तरिय स्वयंसेवक" (Booth level volunteers) या नात्याने ते देतील. तसेच सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्या अधिन राहून नियमानुसार होणाऱ्या गृहनिर्माण संस्थांच्या "वार्षिक लेखा परिक्षणाच्या" (Annual Audit) वेळी "नवीन मतदार, स्थलांतरीत व मयत मतदार यांची अद्ययावत व अचूक माहिती गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांनी " मतदान केंद्रस्तरिय स्वयंसेवक" (Booth level volunteers)" या नात्याने दिनांक १५ ऑगस्ट किंवा तत्पूर्वी सादर केल्याचे एक "प्रमाणपत्र" (Certificate) संबंधित "उपनिबंधक/सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांचेकडे दिनांक ३१ जुलै पूर्वी पाठविल्याबाबतच्या एका स्वतंत्र मुद्दयाचा वार्षिक लेखा परिक्षण अहवालात (Annual Audit Report) समावेश करण्यात यावा.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आहे. त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१२०८२२१५१३०३२३०० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(म.सु.घाटे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग.

प्रति,

१) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) अपर निबंधक (लेखापरिक्षण) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) सर्व विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था,
४) सर्व विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था (लेखापरिक्षण),
५) सर्व जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था,
६) मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
७) सर्व जिल्हाधिकारी,
८) निवडनस्ती संग्रहार्थ.

-----  -----

मह-१६११ -१३-

Scanned by CamScanner